ठाणेनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २५८ /२०२४ दि. २३/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४** चे अनुषंगाने दि. २३/११/२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया चालू असुन, महायुतीचे पक्ष आघाडीवर आहे. त्यामूळे महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे मोठया प्रमाणात आनंद आश्रम, टेंभीनाका, ठाणे व शक्तीस्थळ, खारकर आळी येथे एकत्र जमण्याची शक्यता आहे. त्या दरम्यान परिसरातील वाहतूक सुनिश्चित व सुरक्षित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर व चरई कडून टेंभीनाका मार्गे टॉवरनाक्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्रीभवानी चौक, टि.एम.सी. शाळा नं. १७, टेंभीनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने टेंभीनाका येथून सरळ कोर्टनाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) टेंभीनाकाकडून कोर्टनाका सर्कल कडून व आंनद आश्रम मार्गे टॉवरनाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून डावे वळण घेऊन जांभळीनाका, मुख्य बाजारपेठ मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) ठाणे रेल्वे स्टेशनकडून टॉवरनाका/टेंभीनाकाकडे येणारी सर्व प्रकारच्या बसेस व टि.एम.टी./एस.टी.बसेस तसेच रिक्षा व चारचाकी लहान वाहने यांना **चिंतामणी चौक (टॉवरनाका )** येथे येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | ठाणे रेल्वे स्टेशनकडून सॅटिस ब्रिजवरुन येणाऱ्या परिवहनच्या सर्व एस. टी बसेस तसेच टि. एम. टी. च्या सर्व बसेस हया बी कॅबिन सॅटिज ब्रिज वरुन गोखले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच रिक्षा व चारचाकी लहान वाहने सॅटिज ब्रिज खालुन स्टेशन रोड आहिल्यादेवी पथ मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ४) पारेख ट्रान्सपोर्ट, सिडको रोड कडून खारकळ आळी येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पारेख ट्रान्सपोर्ट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने पारेख ट्रान्सपोर्ट येथून किकनाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ५) महागिरी कोळीवाडा कडून कोर्टनाका व शक्तीस्थळ, खारकर आळीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **महागिरी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने महागिरी नाका येथून डावे वळन घेऊन अमृतेश्वर मैदानाकडून किकनाका मार्गे इच्छित स्थळी जातील किंवा डावे वळण घेऊन ठाणा ट्रेडर्समार्गे महाजनवाडी हॉल येथून कोर्टनाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **NO PARKING** | टॉवरनाका ते टेंभीनाका, कोर्टनाका ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस स्कुल ते शासकीय विश्रामगृह, श्रीभवानी चौक, टेंभीनाका ते ठाणे कोर्ट व कोर्ट परीसर रस्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने **पार्किंग करण्यास मनाई** करण्यात येत आहे. |

सदर अधिसूचना दि. २३/११/२०२४ रोजी १४:०० वा. पासुन दि.२४/११/२०२४ रोजी २२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CamScanner

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदरचो अधिसचुना प्रसिध्दी करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :–**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे

विभाग नियत्रंण, राज्य परिवहन, ठाणे

नियत्रंण कक्ष, ठाणे शहर

विभाग नियत्रंण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे

ठाणे पोलीस पत्रक

**प्रत:–**

नगर अभियंता, ठा. म. पा. ठाणे

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी:–**

सपोआ, ठाणे वाहतुक विभाग,/ पोनिरी ठाणेनगर वाहतुक उप विभाग

२/– म.न.पा.च्या संबंधीत अधिकाऱ्याकडुन आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner

# THANENAGAR TRAFFIC UNIT




CamScanner